पुण्य नगरी
मंगळवार, २० फेब्रुवारी २०२४.

## विवेकानंद कॉलेज

विवेकानंद कॉलेजमध्ये प्रभारी प्राचार्य प्रा. एस. पी. थोरात यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. प्रास्ताविक प्रा.नम्रता ढाळे यांनी केले. ज्युनिअर कॉलेज इतिहास विभागाच्या प्रा. शुभांगी माने-पाटील मनोगत व्यक्त केले. डॉ. कैलास पाटील यांनी आभार मानले. यावेळी सायन्स विभागाचे स्टाफ सेक्रेटरी डॉ. एस. एस. अंकुशराव, ज्युनिअर सायन्स विभाग प्रमुख प्रा. एम. ए. कुरणे, एनसीसी प्रमुख कॅप्टन सुनिता भोसले, लेफ्टनंट प्रा. जे. आर. भरमगोंडा, डॉ. सुनील भोसले, प्रबंधक आर. बी. जोग, सदानंद दुर्गुळे आदी उपस्थित होते.

20/02/24

20/02/24

पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, २० फेब्रुवारी २०२४

**विवेकानंद कॉलेज**

येथे इतिहास विभागातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. प्रभारी प्राचार्य प्रा. एस. पी. थोरात यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रा.नम्रता ढाळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. कैलास पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ.एस. एस. अंकुशराव, एम. ए. कुरणे, सुनीता भोसले, प्रा. जे. आर. भरमगोंडा, डॉ. सुनील भोसले उपस्थित होते.

**महात्मा फुले हायस्कूल**

लक्षतीर्थ वसाहत येथील महात्मा फुले

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ग्लोबल टाइम्स

मराठी दैनिक

भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

Register No. : RNI - MAHAMAR /2012/44621 मुंबई अंक : ३९ वर्ष : १२

Web Site : www.theglobaltime.com ■ मंगळवार दि. २० फेब्रुवारी २०२४ ■ पाने : ०८ ■ किंमत : ₹२.००

# विवेकानंदमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये इतिहास विभागाच्यावतीने हिंदवी स्वराज्य संस्थापक व संरक्षक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९४व्या जयंती साजरी करण्यात आली. याप्रसंगी प्रभारी प्राचार्य प्रा. एस. पी. थोरात यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.मधुरा दाळे यांनी केले. त्या म्हणाल्या की, शिवाजी महाराज हे मानवी मूल्ये जोपासणारे प्रगल्भ विचारांचे लोककल्याणकारी राजे होते. ते समतावादी होते. मानवी मूल्यांसाठी त्यांनी कधीही तडजोड केली नाही. लोककल्याणकारी शासनव्यवस्था हे त्यांचे अंतिम ध्येय होते.

ज्युनिअर कॉलेज इतिहास विभागाच्या प्रा. सौ. शुभांगी माने-पाटील म्हणाल्या की, स्वराज्य संस्थापक शिवरायांचा जन्म दिवस हा संकल्पदिन म्हणून भारतातील प्रत्येकाने साजरा करावा. यादिवशी प्रत्येकांनी एक चांगला संकल्प करून तो पूर्ण करावा. महाराजांच्या मुत्सद्दीगिरी, नेतृत्व, धीरगंभीरपणा, सर्वसमावेशकपणा, धर्मनिरपेक्षता या सर्व गुणांचा अंगिकार प्रत्येकांनी केल्यास समाजातील सर्व समस्या संपतील.

प्रा. डॉ. कैलास पाटील यांनी आभार मानले. यावेळी सायन्स विभागाचे स्टाफ सेक्रेटरी डॉ. एस. एस. अंकुशराव, ज्युनि. सायन्स विभाग प्रमुख प्रा. एस. ए. कुरणे, एनसीसी प्रमुख कॅप्टन सुनिता भोसले, लेफ्टनंट प्रा. जे. आर. भरमगोंडा, डॉ. सुनिल भोसले, महाविद्यालयाचे प्रबंधक आर. बी. जोग, सदानंद दुर्गुळे यांच्यासह महाविद्यालयातील ज्युनिअर व सिनिअर कॉलेजचे प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व एनसीसी छात्र व विद्यार्थी या कार्यक्रमास उपस्थित होते.